# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२३

## (सकाळी ०९.१५ ते १०.४५ वाजेपर्यंत)

**(अ) अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना क्रमांक १ ते ३)**

**(१) ॲड. राहूल कुल, वि.स.स.**

"पुणे शहराची तहान भागविण्यासाठी टाटा पॉवर कंपनीकडून भिरा जलविद्युत केंद्रात वीज निर्मिती केल्यानंतर समुद्रात सोडण्यात येणारे मुळशी धरणातील पाणी पिण्यासाठी वापरण्याबाबत" या विषयावरील श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स. यांच्या दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक १४२ मधील प्रश्न क्रमांक ५२६६० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स.**

"राज्यात गृहनिर्माण संस्थांच्या भूखंड व चटई क्षेत्राचा लाभ हस्तांतरित करण्याबाबत" या विषयावरील श्री.सुनिल प्रभू व इतर वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ६५१०४ ला दिनांक १९ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(३) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.**

"पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) परिसरात रस्त्यावरचा जाहिरात फलक कोसळून झालेल्या अपघातात पाच जणांचा झालेला मृत्यू" या विषयावरील श्री. लहू कानडे व इतर वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ६४५९६ ला दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना क्रमांक ४ व ५)**

**(४) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील आरे वसाहतीमधील २७ आदिवासी पाडयांना जोडणाऱ्या जवळपास ४५ कि.मी. लांबीच्या अंतर्गत रस्त्यांची दुरूस्ती गेल्या कित्येक

अप्रकाशित प्रत

वर्षांपासून करण्यात आलेली नसणे, सदरहू रस्त्यांच्या दुरूस्तीकरिता एम.डी.आर अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०२० पासून सातत्याने मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना निवेदने सादर केलेली असणे, देखभाल दुरूस्तीअभावी या रस्त्यांची मोठया प्रमाणात दुरवस्था झालेली असून या रस्त्यांवर पथदिवेही नसल्याची बाब निदर्शनास आलेली असणे, पथदिव्यांअभावी असणाऱ्या अंधारामुळे मागील काही महिन्यात या ठिकाणी बिबट्याचा संचार वाढला असून बिबट्याने हल्ला केल्याच्या ७-८ घटना घडलेल्या असणे, यात (१) ४ ऑक्टोबर, २०२२ हिमांशू अवधेश यादव (वय ५ वर्ष) आदर्श नगर, (२) २४ ऑक्टोबर, २०२२ कुमारी इकीता लोट, युनिट नं. १५ (वय १.५ वर्ष - मयत), (३) ११ नोव्हेंबर, २०२२ श्रीमती संगीता गुरव, आदर्श नगर. या प्रकरणी पथदिवे सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर तसेच डिसेंबर, २०२१ तसेच माहे जुलै व नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत यांना निवेदनही दिलेले असणे, रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे व पथदिवे बंद असल्यामुळे या भागातील आदिवासी नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत, रात्री अपरात्री वैद्यकीय सुविधेसाठी जाण्याकरिता अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून वेळप्रसंगी नागरिकांना वेळेवर उपचार न मिळाल्याने जीवही गमवावा लागत असणे, सदरहू रस्त्यांच्या देखभाल दुरूस्तीअभावी व पथदिवे बंद असल्याने स्थानिक आदिवासी नागरिकांना होत असलेला त्रास व या रस्त्यांच्या दुरूस्तीकरिता प्राप्त होणारा निधी लक्षात घेता सदरहू रस्ते हे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत तसेच रस्त्यांच्या विकास व दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार लेखी निवेदनाव्दारे मागणी केलेली असणे, परंतू अद्यापही या प्रकरणी शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, केवळ रस्त्यांच्या दुरूस्तीच्या नावाखाली तुटपुंज्या निधीची उपलब्धता शासनाकडून करण्यात येत असल्याने या रस्त्यांच्या दुरवस्थेत दिवसेंदिवस वाढ होत असणे, सदरहू रस्ते बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे शक्य नसल्यास, सदरहू रस्त्यांची मालकी ही शासनाकडेच ठेवून केवळ देखभाल दुरूस्तीकरिता सदरहू रस्ते बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत स्थानिक नागरिकांकडून मागणी करण्यात येणे, आरे क्षेत्रामधील अंतर्गत रस्त्यांच्या सिमेंट काँक्रीटीकरणाच्या कामांकरिता १७३ कोटीच्या निधीची आवश्यकता असतांना अंतर्गत रस्त्याच्या डांबरीकरणासाठी रुपये ४८ कोटी खर्चाच्या प्रस्तावास सार्वजनिक बांधकाम विभागाव्दारे तांत्रिक मान्यता देण्यात आली असणे, परंतु येत्या दोन वर्षात मुंबईतील रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्यासाठी मुंबई महापालिकेने सहा हजार कोटीचे बजेट केलेले असणे, मुंबईच्या रस्त्याकरिता शासन ६०० हजार कोटीच्या निधीची तरतुद करत असतांना आरे क्षेत्रातील आदिवासी पाडयांमधील अंतर्गत रस्त्यांच्या कॉक्रिटीकरणाकरिता १७३ कोटीच्या निधीची तरतूद करण्यास असमर्थता दर्शविणे, आरे क्षेत्रातील अंतर्गत रस्त्यांच्या कॉक्रिटीकरणाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी सातत्याने पाठपुरावा करुनही शासन स्तरावर कोणतीच दखल घेतली जात नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अप्रमाणित प्रत

**(५) श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"दिनांक ३० जून, २०२३ रोजी नागपूरहून पुण्याकडे येणारी विदर्भ ट्रॅव्हल्सच्या बसचा समृध्दी महामार्गावर पिंपळखुटा गावानजिक भीषण अपघात होऊन २५ प्रवाशांचा होरपळून मृत्यू होणे, अपघातातील वाहन चालकाने मद्यपान केलेले असणे, मद्यपान करुन वाहन चालविणाऱ्या सार्वजनिक व खाजगी वाहन चालकांवर कार्यवाही करण्याची आवश्यकता, भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी शासनाने महामार्गाच्या प्रवेशव्दारावर श्वास विश्लेषक यंत्र (Breath-Analyzer) लागू करणे, ड्रायव्हर फास्ट लेनमध्ये बस चालवून लेन नियमांचे उल्लंघन करणे, अशा चालकांना दंड करुन कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, अपघात कमी करण्यासाठी लेन शिस्त सुनिश्चित करणे, वाहन चालकांची नियमित फिटनेस व वैद्यकीय चाचण्या घेण्याची आवश्यकता, समृध्दी महामार्गाच्या रचनेतील दोषही अधोरेखित झाला असणे, भविष्यात होणारे अपघात टाळण्यासाठी शासनाने या समस्येची सखोल चौकशी करुन त्यावर उपाययोजना करण्याची आवश्यकता, महामार्गावरील कोणत्याही डिझाइनचे योग्य अभियांत्रिकी मूल्यांकन करणे, महामार्गावर टायर फुटण्याच्या वारंवार घटना घडत असल्यामुळे रस्त्यांची स्थिती व निराकरण करण्यासाठी महामार्गावरील नियमित देखभाल तपासणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ब) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)**

**(१) श्री.संजय केळकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"ठाण्यामधील खाजगी नर्सिंगचे प्रमाणपत्र ग्राह्य मानले जात नसल्याचे कारण पुढे करत कोणतीही पूर्वसूचना न देता ६० हून अधिक नर्सेसना आपला दवाखान्याच्या संचालकांनी कामावरून तडकाफडकी कमी करणे, सदर बाब दिनांक ७ जून, २०२३ रोजी निदर्शनास येणे, तसेच काम करूनही संबंधित कर्मचाऱ्यांना दोन महिन्याचे वेतन देखील अदा न करणे, त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ येणे, या प्रकरणी अन्यायग्रस्त परिचारिकांनी आरोग्य विभागाकडे धाव घेणे, मात्र त्यांना कोणत्याही प्रकारचा दिलासा शासनाकडून न मिळणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(बुधवार, दिनांक २ ऑगस्ट, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक २ ते ५)**

**(२) श्री. राजेश पाडवी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नंदुरबार जिल्हा हा आदिवासी बहुल असून स्वातंत्र्य लढ्यात ब्रिटिशांविरुद्ध लढा देत बलिदान दिल्याचा नंदुरबार जिल्ह्याचा क्रांतिकारी इतिहास असणे, मुख्य नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यात गुलाम महाराज व रामदास महाराज यांनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढा देत ब्रिटिशांचा विरुद्ध अनेक लढायांचे नेतृत्व करणाऱ्या आदिवासी क्रांतिकाराकांचा जाज्वल्य इतिहास उपलब्ध असणे, तळोदा तालुक्यातील रावळापाणी येथे सन १९४३ मध्ये आदिवासी स्वातंत्र्यसैनिकांवर ब्रिटिश राजवटीने बेछुट गोळीबार करत महाभयंकर "रावळापाणी हत्याकांड" घडवलेले असणे, जालियनवाला बाग हत्याकांडाप्रमाणे ब्रिटिश सैन्याने रावळापाणी गावावर हल्ला केलेला असणे, त्यामध्ये शेकडो निष्पाप आदिवासी मारले गेलेले असणे, हे हत्याकांड ब्रिटिशांच्या दडपशाहीचे क्रूर कृत्य असणे, या घटनेचा आजही सरकारी संकेतस्थळावर पुरावा प्रसिद्ध असणे, गुलाम महाराज, रामदास महाराज व रावळापाणी हत्याकांड स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील महत्वाचे भाग असणे, नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींना त्यांचा अभिमान असणे, नंदुरबार जिल्ह्याला आदिवासी वीरांचा स्वातंत्र्याच्या लढ्यातील धैर्याचा व त्यागाचा इतिहास प्राप्त असणे, मात्र रावळापाणी आदिवासी गावात आजही मूलभूत सुविधांचा अभाव असणे, आदिवासी पर्यटनाचा एक भाग म्हणून गुलाम महाराजांच्या स्मारकाला चालना दिल्यास परिसरातील आजूबाजूचा मोठा भाग विकसित होणार असणे, यासंदर्भात गुलाम महाराज यांच्या "आप की जय" परिवारातील सदस्यांची अनेक वर्षापासूनची मागणी असणे, गुलाब महाराज, रामदास महाराज व रावळापाणी हत्याकांडाचा समावेश आदिवासी वीरांच्या यादीत तसेच अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहरांमध्ये महापालिका शाळांवर कोट्यावधी रुपयांचा खर्च केला जात असणे, दुसरीकडे विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी पुरेसे शिक्षक उपलब्ध नसणे, शैक्षणिक गुणवत्तेचा व विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न निर्माण होणे, विद्यार्थी नियमितपणे शाळेत येणे पण त्यांना शिकवायला शिक्षकच नसणे, ही दुरावस्था एखाद्या खेड्यातील अथवा दुर्गम भागातील नसून विद्येचे माहेरघर समजणाऱ्या पुणे शहराची असणे, महापालिकेच्या शाळांमधील एकूण ७२७ शिक्षकांच्या जागा रिक्त असणे, अंतर जिल्हा बदलीतून २१९ शिक्षकांना मान्यता देण्यात येणे, परंतु शिक्षण विभागाने सदरचा प्रस्ताव अडवून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार समोर येणे, अतिरिक्त महापालिका आयुक्त यांनी शिक्षण विभागाच्या

अधिकाऱ्यांची झाडाझडती घेणे, शिक्षकांची नियुक्ती न केल्याचा आदेश त्वरित काढा अन्यथा कारवाई करण्याचा इशारा अतिरिक्त महापालिका आयुक्तांनी देण्यात येणे, मराठी, उर्दू, कन्नड, इंग्रजी माध्यमाच्या एकूण २८४ शाळा असणे, त्यामध्ये अंदाजे ९३ हजार विद्यार्थी शिक्षण घेत असणे, बिबवेवाडी गावातील सरसेनापती हैबतराव शिळीमकर माध्यमिक शाळा येथील विविध समस्यांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी महापालिका आयुक्त यांना दिनांक १९ एप्रिल, २०२३ रोजी निवेदन देण्यात येणे, यामध्ये शाळेतील शौचालय, पाणी, विद्युतची साधने, अस्वच्छता, सी.सी.टीव्ही, सुरक्षा रक्षकांचा अभाव, शिक्षक नसणे, शाळेमध्ये विद्यार्थ्यांकरीता क्रिडांगण असणे, परंतु सदर क्रिडांगण हे खाजगी संस्थेला दिल्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना हे क्रिडांगण उपलब्ध न होणे, सदर निवेदनामध्ये कारवाई करण्याबाबतच्या सूचना देण्यात येणे, यासंदर्भात महापालिका आयुक्त यांनी दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी शिक्षणाधिकारी, शिक्षण मंडळ यांच्यासमवेत महापालिकेमध्ये बैठक घेण्यात येणे, महापालिका आयुक्त यांनी याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देऊनही माहे जून पर्यंत याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना शिकविण्याठी शिक्षक उपलब्ध नसणे, यासाठी शिक्षण मंडळाने शिक्षक उपलब्ध होण्याबाबत एका संस्थेची निवड करण्यात येणे, या संस्थेच्या माध्यमातून संबंधित शाळांना शिक्षक उपलब्ध होणे, परंतु सदर शिक्षक हे शाळेमध्ये नियमित न जाणे, परिणामी विद्यार्थ्यांचे नुकसान होणे, अशीच परिस्थिती पुणे शहरातील विविध शाळांमध्ये असणे कै. वस्ताद हरिभाऊ पोकळे शाळेमध्ये शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे होत असलेले नुकसान, याबाबत स्थानिक माजी नगरसेवक व संतप्त नागरिकांनी महापालिका आयुक्त यांच्याकडे शिक्षक नियुक्तीची मागणी करण्यात येणे, परंतु शिक्षण मंडळ शिक्षकांची नियुक्ती करीत नसेल तर स्वखर्चाने शिक्षक नियुक्त करू असा इशारा देण्यात येणे, एकीकडे कोट्यावधी रुपये महापालिकेच्या विविध योजनांकरीता खर्च करीत असताना पुणे शहरातील महापालिकेच्या शाळांची होत असलेली दुरावस्था, परिणामी विद्यार्थ्यांचे होत असलेले नुकसान, शाळांच्या दुरावस्थेला जाबाबदार असलेल्या तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी यावर कोणती उपाययोजना न करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"चंद्रपूर तालुक्यात ताडाळी येथील एम.आय.डी.सी. परिसरात धारिवाल पावरप्लँट अस्तित्वात असणे, सदर पावरप्लँट मध्ये जुन्या मशनरींचा वापर होत असणे, सदर प्लँटमुळे सभोवतालच्या परिसरात प्रदूषण होत असल्याचे माहे जुलै, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, या प्लँटद्वारे वर्धा नदीच्या पात्रातून पाणी चोरी केली जात असणे, या प्लँटमुळे तयार होणारी राख शेतकऱ्यांच्या शेतात पसरली जात असणे, यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत असणे, कंपनीद्वारे शेतकऱ्यांना कुठलीही मदत मिळत नसणे, या कंपनीमुळे वाहतूकीस अडथळा निर्माण होऊन वारंवार अपघात होत असणे, या कंपनीवर सदोष मनुष्यवधाचा

गुन्हा दाखल करण्याची मागणी होत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री. अनिल बाबर, ॲड. शहाजीबापू पाटील, सर्वश्री. बाळासाहेब पाटील, विक्रमसिंह सावंत, डॉ.विश्वजित कदम, श्रीमती सुमन पाटील, श्री. जयकुमार गोरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यभर सुरु झालेल्या पावसामुळे सर्वत्र अतिवृष्टी होणे, विशेषतः सांगली जिल्ह्यातील काही विशिष्ट भागात माहे जून-जुलै, २०२३ या महिन्यात पडलेला मुसळधार पाऊस, तर काही भागात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती, जिल्ह्यातील खानापूर, आटपाडी, तासगांव, कडेगांव, जत, कवठेमहांकाळ व सोलापूर जिल्हयातील सांगोला, मंगळवेढा, तसेच सातारा जिल्हयातील माण, खटाव इत्यादि तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई उद्भवत असल्याचे निदर्शनास येणे, उक्त जिल्ह्यांत जलसंपदा विभागाच्या टेंभू/ताकारी/म्हैसाळ/विसापूर पुणदी/उरमोडी उपसा सिंचन योजना सध्यस्थितीत सुरु असणे, जिल्हयातील पाणी टंचाईवर मात करण्याकरिता पावसाळयात वाहून जाणारे पाणी उचलून ते दुष्काळी भागात पुरविण्याची नितांत आवश्यकता, काही भागात टँकर पुरविण्याची नितांत आवश्यकता असतांना याबाबत शासन उदासिन असणे, परिणामी पाणी टंचाईमुळे नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष असून त्यांना पाण्याकरिता करावी लागत असलेली वणवण, तसेच उक्त उपसा–सिंचन योजनांना पुरविण्यात येणारी वीजेवर वीज सवलत माहे एप्रिल, २०२३ पासून बंद करण्यात आलेली असणे, सदर सवलत माहे एप्रिल, २०२३ पूर्वी रु.१.१६ प्रतियुनिट असणे तर आता ती प्रतियुनिट रु.५.२६ आकारण्यात येणे, त्यामुळे आर्थिक भार पडत असल्याने बंद पडण्याची आलेली वेळ, त्यामुळे सदर उपसा सिंचन योजनांना वीज सवलत सुरु करुन टंचाईमधून वीज बिल भरण्याबाबत करावयाची कार्यवाही, त्याचबरोबर टंचाईग्रस्त भागात चारा डेपो सुरु असून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, टंचाईग्रस्त भागात तात्काळ पाणी उपलब्ध व्हावे याद्दष्टीने शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | : | **(क)** | महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | **(ख)** | नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| **(२)** | **सांस्कृतिक कार्य मंत्री** | : | | "हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांचे वाडा राष्ट्रीय स्मारक अद्याप उभारण्यात आले नसल्याबाबत" या विषयावरील श्री.दिलीप मोहिते-पाटील व इतर वि.स.स. यांच्या दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी झालेल्या म.वि.स. नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान हुतात्मा शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकास आराखड्यासंदर्भातील प्रगती अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| **(३)** | **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** | : | **(क)** | एमआयटी आर्ट, डिझाइन ॲण्ड टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | **(ख)** | श्री बालाजी विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१९-२०२० ते सन २०२२-२०२३ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | **(ग)** | मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील. |
| **(४)** | **उद्योग मंत्री** | : | | मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा पंचावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : विरोधी पक्ष नेत्याच्या नियुक्तीबाबत घोषणा.**

अस्वाक्षरित प्रत

**पाच : शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या अशासकीय कामकाजाबाबत घोषणा.**

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(१) श्री.रवि राणा, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"हिंदवी स्वराज्याचे जनक श्रीमंत छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचे स्मारक छत्री तलाव परिसरात बांधकामासाठी विकास आराखडा तयार करून आवश्यक तो निधी अमरावती शहरात मिळण्याबाबत तसेच अखंड भारताचे श्रध्दास्थान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा अमरावती इर्विन चौक येथे उभारून पुतळा परिसर स्मारकाकरिता व सौंदर्यीकरण व्हावे याकरीता अमरावती शहरातील तसेच ग्रामीण भागातील जनतेची होत असलेली मागणी, पुतळा परिसर स्मारकाकरिता व सौंदर्यीकरणाकरीता लगतची जमिन अधिग्रहण करून निधी उपलब्ध करून देणे आवश्यक असणे, तसेच अमरावती मनपा क्षेत्र अंतर्गत गाडगे बाबा समाधी मंदिराच्या विकास करण्याकरिता त्याप्रमाणे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सेवा आश्रम मोझरी, तालुका तिवसा, जिल्हा अमरावती येथील व अमरावती मनपा क्षेत्रातील भिमटेकडीचा विकास करण्यासाठी तसेच महर्षी वाल्मिकी मठ संस्थान सामदा कशिपुर ता. दर्यापुर येथील “ब” वर्ग तिर्थक्षेत्राची विकासकामे होण्याकरिता विशेष तरतुद करुन प्रशासकीय पूर्तता करण्याची आवश्यकता, मोर्शी तालुक्यात रिध्यपुर महानुभव क्षेत्र, कोंडेश्वर ता. अमरावती तिर्थस्थळाचा, ऋणमोचन ता.भातकुली तिर्थ स्थळाचा विकास करण्यासाठी व जिल्हयातील पर्यटन क्षेत्राचा विकास करून देण्यासाठी शासनाकडून निधी मंजूर होऊन कामे तात्काळ सुरु करण्याची होत असलेली मागणी, उपरोक्त विकासकामांकरीता विकास समिती नेमण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री.बच्चु कडू, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"विदर्भातील अचलपूर-मुर्तीजापुर या लोहमार्गावर चालणाऱ्या शकुंतला या नॅरोगेज रेल्वे गाडीचा एकूण ७५.६४ किमी लांबीचा रेल्वे मार्ग अद्यापपर्यंत नॅरोगेजच असणे, या रेल्वेचा ग्रेट इंडिया पेनिनसुला रेल्वे कंपनीसोबतचा ९८ वर्षाचा करार माहे डिसेंबर, २०१३ मध्ये संपुष्टात येणे, अद्यापपर्यंत या रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर न करणे, या रेल्वे मार्गाला मुख्य रेल्वे मार्ग जोडण्यासाठी कोणतीही उपाययोजना न करणे, शकुंतला रेल्वे गाडी ही अचलपूर-मूर्तिजापूर इत्यादी भागातील अनेक लोकांच्या व्यापार व्यवसाय रोजगार शेतमालाची वाहतूक आणि प्रवास इत्यादीसाठी अत्यंत आवश्यक असतानाही या मार्गाच्या विकासाकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, राज्य व केंद्र शासनाकडे सन २०११ पासून अनेक वेळा पत्र व्यवहार करून तसेच

अशुद्धमुद्रित

विधानसभेत प्रश्न उपस्थित करूनही शासनाने या संदर्भात कोणतीही कार्यवाही न करणे, अमरावती-बडनेरा, अकोट-खंडवा, अमरावती-नरखेड हे रेल्वे मार्ग विकसित होत असताना शकुंतला दुर्लक्षित राहत असल्यामुळे या भागातील जनतेमध्ये शासनाविषयी निर्माण झालेला तीव्र असंतोष, राज्य शासनाने रेल्वे मंत्रालयाशी चर्चा करून तसेच आवश्यक निधीची तरतूद करून शकुंतला रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करण्यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"समाजात असलेले तृतीय पंथीय म्हणजेच किन्नरांच्याही विविध मागण्या प्रलंबित असणे, किन्नर समाजाच्या संघटनांच्या प्रतिनिधींनी गेल्या अधिवेशनात त्यांच्या मागण्या सरकारकडे मांडलेल्या असणे, किन्नर लोकांना समाजात बहिष्कृत केले जाते किंवा वाईट वागणूक मिळत असणे, त्यांना रोजगारही मिळत नसल्याने ते भीक मागताना ट्रॅफिक सिग्नलवर किंवा इतर ठिकाणी दिसत असणे, महाराष्ट्र हे प्रगत राज्य तर आहेच पण देशाला दिशा दाखविणारे राज्य आहे त्यामुळे तृतीय पंथीयांना समाजात समानतेचा अधिकार देऊन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी "किन्नर कल्याण महामंडळ" स्थापन करण्याची नितांत आवश्यकता, तसेच किन्नरांसाठी स्वतंत्र शौचालये नसल्याने त्यांची प्रचंड कुचंबणा होणे, त्यामुळे अशी शौचालये तातडीने बांधणे अत्यावश्यक असणे, त्याचप्रमाणे सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण, पोलीस स्टेशनमध्ये स्वतंत्र सेल, रेल्वेगाडीत महिलांसाठी असते तशी किन्नरांसाठीच स्वतंत्र बोगी, सरकारी अर्जामध्ये स्त्री, पुरूष याप्रमाणेच किन्नर असा तिसरा कॉलम यासह त्यांच्या रोजगार, घर, शिक्षण याबाबत त्यांच्या विविध मागण्या असणे, तसेच काही दिवसांपूर्वी शासनाच्या पोलिस भरती प्रक्रियेमध्ये मा. उच्च न्यायालयाने हस्तक्षेप करून तृतीय पंथियांना सामावून घेण्यासंदर्भात आदेश दिलेले असणे, त्यामुळे तृतीयपंथियांना देखील समाजात मान-सन्मान मिळावा हे मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयावरून दिसून येणे, त्यासाठी शासनाने किन्नरांच्या कल्याणासाठी व त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी, त्यांचे शिक्षण, रोजगार, घर आणि इतर कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी महामंडळाची स्थापना करणे गरजेचे असणे, समाज कल्याण खात्याच्या अंतर्गत किन्नरांच्या सर्व मागण्या, त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी कृती आराखडा बनविणे, त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे, यासाठी तृतीय पंथियांना समानेतचा अधिकार देण्याकरिता शासनाने लवकरात लवकर निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व उपाययोजना."

**(४) ॲड.आशिष जयस्वाल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील दिव्यांग मुलामुलींची शाळा/कर्मशाळा व मतिमंद मुलांचे बालगृहाला अनुदान तत्वावर मान्यतेबाबत बृहत आराखडा व पदमान्यता नसल्याने अनेक वर्षांपासून अश्या शाळांना अनुदान न मिळणे, बिगर अनुदान तत्वावर वर्षानुवर्षे या शाळा कार्यरत असल्याने शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांनी विनावेतन अत्यंत विपरीत परिस्थितीत काम करत असणे, अनुदानाअभावी दिव्यांग शाळेतील खास करून मतिमंद मुलामुलींचे हाल होणे, काही शाळांना शासनाने विशेष बाब म्हणून मान्यता देणे, मात्र राज्यातील विशेष बाब म्हणून मंजूरी प्रदान केलेल्या अश्या शाळांना वेतनेत्तर अनुदान व पदमान्यता न मिळाल्याने अश्या शाळांच्या मुलांवर, पालकांवर व कर्मचाऱ्यांच्या मनात शासनाविरोधात निर्माण झालेला प्रचंड असंतोष, या प्रकरणी शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनास प्राप्त असलेल्या अनुदान व पदमान्यतेच्या प्रस्तावास तात्काळ मान्यता देण्याची व बृहत आराखडा तयार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(५) ॲड.आशिष शेलार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शहरामध्ये अनेक झोपडपट्टया असून सदर झोपडपट्टयांचा पुर्नविकास झो.पू. प्राधिकरणामार्फत करण्यात येत असणे, मुंबई शहर हे समुद्रकिनारी वसल्यामुळे अनेक झोपड्या ह्या या किनाऱ्यावरील वेगवेगळ्या प्रयोजनासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर वसलेल्या असणे, त्यामुळे हे झोपडपट्टी पुनर्विकासाचे अनेक प्रकल्प CRZ-II मध्ये आरक्षित जागांमुळे बाधित होत असणे, त्यामुळे या झोपडपट्टयांचा विकास करणे CRZ च्या नियमाप्रमाणे शक्य होत नसणे, या CRZ च्या अधिसूचना २०१९ मध्ये पॅरा ५.२ (IV) आणि नवीन खंड पॅरा १० मध्ये पॅरा १०.३ (III) मध्ये काही बदल महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाला करण्यासाठी पत्राद्वारे विनंती केलेली असणे, सदर विनंतीला अनुसरून पॅरा ५.२ (IV) आणि पॅरा १०.३ (III) मध्ये काही बदल करण्यासाठी केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाच्या CRZ कमिटीने दिनांक २० जून, २०२३ रोजी झालेल्या बैठकीत महाराष्ट्र शासनाकडे या बदलांच्या संदर्भातील सविस्तर अहवाल मागवलेला असणे, त्यामुळे मुंबईतील CRZ मधील आरक्षित जागांवर मोडत असलेल्या झोपडपट्टयांचा विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सदर अहवाल निर्धारित वेळेत केंद्रीय पर्यावरण विभागाला सादर करून मुंबईच्या किनारपट्टी भागातील रखडलेल्या झोपडपट्टयांचा पुर्नविकास करण्यासाठी CRZ-II मध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अप्रकाशित प्रत

**(६) सर्वश्री.नाना पटोले, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, सुभाष धोटे, सुनिल केदार, विकास ठाकरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"श्री महाकाली को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी आणि इतर बोगस कंपन्या" अंतर्गत आयआयटी पवई, मुंबई, महाराष्ट्र येथे २००० कोटी आणि त्याहून अधिक रकमेचा एक फार मोठा घोटाळा झालेला असणे सन २०१८-२०१९ दरम्यान शासकीय भारतीय तंत्रज्ञान संस्था बॉम्बे येथील कर्मचारी श्री रितेश पांचाळ हे सेवारत केंद्र सरकारचे IITB कर्मचारी, श्री महाकाली IITB पवई घोटाळ्याचे संचालक, प्रवर्तक, एजंट, सबएजेंट असणे, या कंपन्यांमध्ये संपूर्ण महाराष्ट्र आणि आसपासच्या राज्यांमधील अंदाजे १५००० हून अधिक गुंतवणूकदारांनी खूप मोठी गुंतवणूक केलेली असणे, सदर कंपनी सन २०१८-२०१९ दरम्यान सुरू होऊन आणि २००० कोटींहून अधिक व्यवसाय केल्यानंतर श्री रितेश पांचाळच्या अटकेनंतर दिनांक १० ऑगस्ट, २०२२ रोजी बंद झालेली असणे, या केंद्र सरकारच्या आयआयटीबी कर्मचाऱ्यांनी १५०००-२५००० रुपयांची लूट केली असणे, या गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी कोणतेही सरकारी अधिकारी मदत करत नसल्यामुळे या गुंतवणूकदारांना खूप कठीण वेळ आलेली असणे, परिणामी गुंतवणुकधारांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन सदर गुंतवणूक कंपनीतील संचालक, प्रवर्तक, एजंट, सबएजेंट यांचेवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याबाबत याप्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(७) श्रीमती गीता जैन, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मीरा-भाईंदर (जि. ठाणे) येथील नयानगर पोलीस स्टेशन मध्ये दिनांक १९ जून, २०२३ रोजी एका १३ वर्षीय मुलगी व तिची आई लैंगिक अत्याचार व धर्मांतराची तक्रार देण्यासाठी गेलेली असताना सदरहू पिडीत मुलीला व तिच्या परिवाराला नयानगर पोलिसांकडून देण्यात आलेली अन्यायकारक वागणूक, तक्रार देण्यासाठी गेलेल्या पिडीत मुलीच्या आईची तक्रार घेण्यास त्यावेळी कार्यरत असलेले नयानगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षकांकडून टाळाटाळ करण्यात आलेली असणे, बराच वेळ वादविवाद झाल्यानंतर सुमारे ९ तासाने गुन्हा नोंदविण्यात आलेला असणे (त्याचा FIR NO ०३२८) मात्र सदरहू गुन्हा नोंदवितांना पिडीत मुलीच्या आईने सांगितल्याप्रमाणे गुन्हा नोंदविलेला नसणे, इतकेच नव्हे तर, पोलीस निरीक्षक यांनी फक्त पिडीत मुलीला त्यांच्या केबिनमध्ये घेऊन गेले असता पिडीत मुलीच्या आईने त्यांच्या कॅबिनमध्ये येण्याची विनंती केलेली असतानाही ती नाकारण्यात आलेली असणे, पोलीस निरीक्षक यांनी घेतलेल्या जबाबात पिडीत मुलीच्या आईला धमकी देऊन जबरदस्तीने सही करण्यास भाग पाडणे, यामुळे नयानगर पोलिसांकडून

अप्रकाशित प्रत

अधिकाराचा दुरुपयोग तसेच कामात कसूर करून जाणीव पूर्वक POCSO कायद्याचे उल्लंघन करण्यात आलेले असणे, यामुळे सदर प्रकाराबाबत पिडीत मुलगी व तिची आई यांनी नयानगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांच्या विरोधात पोलीस उपआयुक्त झोन क्र.०१ यांच्याकडे केलेली तक्रार, त्यानुषंगाने नयानगर पोलिसांनी पुरवणी जबाब नोंदविलेले असणे, मात्र आजमितीस नयानगर पोलिसांकडून संबंधित गुन्हेगाराविरोधात कारवाई झालेली नसणे, दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी व त्यासुमारास नयानगर पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात पुन्हा लैंगिक अत्याचार व धर्मांतराची दुसरी घटना घडल्याचे उघडकीस येणे, या घटनेसंदर्भात तेथील ड्यूटीवर असलेल्या पोलीस अधिकारी यांनी प्रथमता गुन्हा नोंदवण्यास टाळाटाळ करणे व ११ तासानंतर (FIR NO ४००) नोंदविलेला असणे, या प्रकरणातही नयानगर पोलिसांनी पिडीत मुलीने सांगितल्याप्रमाणे जबाब घेण्यास टाळाटाळ केलेली असणे तसेच या नोंदणी केलेल्या गुन्ह्याचा FIR देण्यास ११ तासांहून अधिक विलंब केलेला असणे, सदर दोन्ही घटनेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी जाणीवपूर्वक अधिकाराचा दुरुपयोग व कामात कसूर करुन गुन्हा दाबण्याचा प्रकार केलेला असणे, परिणामी या गुन्ह्यामध्ये आरोपींना कोर्टाकडून जामीन मिळवण्यासाठी सर्वतोपरी मदत केल्याचे स्पष्टपणे उघडकीस आलेले असणे, पोलिसांच्या या पक्षपाती व गुन्हेगारांना संरक्षण देण्यासाठी केलेल्या गैर प्रकाराबाबत तेथील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, तसेच महिलांच्या सुरक्षेची निर्माण झालेली गंभीर समस्या, याप्रकरणी पिडीत मुलींना न्याय मिळण्याचा दृष्टीने सखोल चौकशी होऊन संबंधित दोषी पोलीस अधिकाऱ्यांविरोधात विनाविलंब कायदेशीर कारवाई करण्याची आवश्यकता, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्री.कुणाल पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभ क्षेत्रातील स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनींवर हस्तांतरणाचे असलेले निर्बंध राज्य सरकारने शिथील केलेले असणे, त्यामुळे पुणे जिल्ह्यातील ९ तालुक्यातील २३८ गावांमधील सुमारे ११ हजार ३१७ एकर जमिनींवरील 'पुनर्वसनाचे राखीव शेरे' कमी झालेले असणे, त्यामुळे वर्षानुवर्ष निर्बंधांच्या लालफीतीमध्ये अडकलेल्या सुमारे ४ हजार ६५० सातबाऱ्यांवरील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून अशा शेतजमिनींची खरेदी विक्री करण्याचा मार्ग मोकळा झालेला असणे, धरणाची उभारणी करताना आवश्यक असलेले क्षेत्र विचारात घेऊन राज्य सरकारने महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियमानुसार अशा प्रकल्पांचा लाभ क्षेत्रातील स्लॅबपात्र खातेदारांचा (शेतकऱ्यांचा) जमिनींचा सातबारा उताऱ्यावर इतर हक्कात 'पुनर्वसनासाठी राखीव' शेरे असे लिहिले जात असणे, त्यामुळे जमिनीच्या खरेदी विक्री व्यवहारांवर निर्बंध आलेले असणे, प्रकल्पांच्या लाभ क्षेत्रातील अशा जमीन मालकांना अनेक वर्षांपासून

अग्रिम प्रत

त्यांच्या जमिनीची खरेदी विक्री आणि वारसा हक्कानुसार विभागणी करण्यात अडचणी येत असणे, या पार्श्वभूमीवर तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने पुणे जिल्ह्यातील हे निर्बंध शिथिल करण्याचा निर्णय घेतलेला असणे, याच धर्तीवर धुळे तालुक्यातील सुलवाडे-जामफळ-कनोली उपसा सिंचन योजनेसाठी आवश्यक जमीन संपादित करण्यात आली असून धुळे तालुक्यातील कुंडाणे, वेल्हाणे व बाबरे या गावातील सर्व जमिनी खरेदी-विक्री व हस्तांतरणासाठी निर्बंध घातलेले असणे, तसेच धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात पांझरा नदीवर निम्नपांझरा (अक्कलपाडा) मध्यम प्रकल्प तसेच सिंदखेडा तालुक्यात बुराई नदीवर वाडी-शेवाडी मध्यम प्रकल्प पूर्ण झालेले असून प्रकल्प बाधित गावांचेही पुनर्वसन झाले असूनही लाभ क्षेत्रातील जमिनीवर 'राखीव' असा शेरा असल्याने सदर जमिनीची खरेदी विक्रीसाठी निर्बंध घातलेले असणे, त्यामुळे जमीन खरेदी-विक्री व हस्तांतरण करता येत नसणे, तरी भविष्यात भूसंपादन करण्याचा अधिकार कायम ठेवून शासनाने या गावांतील शेतजमिनींचे हस्तांतरण व खरेदी-विक्री यावर घातलेले निर्बंध तातडीने हटविण्याची आवश्यकता असणे, परंतु जिल्हा प्रशासनाचे विशेषत: जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांचे या बाबींकडे होत असलेले दुर्लक्ष परिणामी, सदर शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) श्री.सुनिल शेळके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जिल्हा पुणे, तालुका मावळ मधील तळेगाव दाभाडे येथील इंद्रायणी विद्या मंदिर महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने महाविद्यालय इमारतीच्या सुधारित बांधकामासाठी परवानगी मिळण्याकरीता तळेगाव दाभाडे नगरपरिषदेकडे प्रस्ताव सादर केलेला असणे, परंतु सदर प्रस्तावात त्रुटी असल्याने नगरपरिषद प्रशासनाने बांधकाम परवानगी नाकारली असून बांधकामाची परवानगी नसतानाही महाविद्यालय व्यवस्थापनाकडून सदर बांधकाम अवैधरित्या सुरू असल्याने स्थानिकांकडून हे बांधकाम स्थगित करण्यात यावे अशा स्वरूपाच्या तक्रारी देखील नगरपरिषद प्रशासनाला तसेच शासनाकडे करण्यात आले असल्याचे निदर्शनास येणे, सदर तक्रारीच्या अनुषंगाने मा. विभागीय आयुक्त, पुणे यांनी वस्तुस्थितीदर्शक अहवाल दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी शासनाकडे पाठविला असल्याचे निदर्शनास येऊन सदरचा अहवाल शासनाकडे (महसूल विभाग) प्रलंबित असल्याचेही निदर्शनास येणे, इंद्रायणी विद्या मंदिर महाविद्यालयाच्या सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामाला स्थगिती द्यावी अशी सर्व स्तरावरून वारंवार मागणी होत असणे, परंतु सदर मागणीकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी जनतेमध्ये शासनाविषयी वाढलेली तीव्र नाराजी, तसेच महाविद्यालय व्यवस्थापनाविरुद्ध चौकशी करून कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१०) श्री.नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"शासनाने अवैध वाळू व्यवसायाला थांबविण्याकरीता वाळू धोरण तयार केले असणे, परंतू भंडारा जिल्हयात या धोरणाला हरताळ फासून वाळू मिश्रीत रेती व रेतीच्या वाहतुकीच्या नावावर महसूल व पोलीस विभागातील काही भ्रष्ट अधिकारी यांनी संगनमत करुन शासनाची कोट्यवधीची लूट करुन महसूल बुडविलेला असणे, तसेच मध्यप्रदेशातील महाराष्ट्राच्या सीमेलगत रेती साठवणूकीचा परवाना घेऊन भंडारा जिल्ह्यात वाळूचा अवैध व्यवसाय सुरु असणे, या व्यवसायात प्रत्येक ट्रकमागे महसूल विभागाचे ३० हजार व पोलीस विभागाचे २० हजार असे दर निश्चीत झाल्याची माहिती सूत्राकडून प्राप्त झाली असणे, ऑनलाईन वाळूची विक्री या धोरणाचा मोठे व्यवसायीक यांना लाभ पोहचविण्याकरीता पोलीस व महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकारी यांना हाताशी धरुन वाळू माफियांचा गोरखधंदा सुरु असणे, साठवणूक करण्याच्या ठिकाणी क्षमतेपेक्षा जास्त साठा असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, परिणामी सामान्य लोकांना वाळूकरीता जास्त पैसे मोजावे लागणे, त्यामुळे वाळूच्या किंमतीवर नियंत्रण राखण्यास शासनास आलेले अपयश, परिणामी जनसामान्याच्या खिशास वाळू खरेदीकरीता मोजावी लागणारी अतिरीक्त रक्कम, त्यामुळे बांधकामाच्या किंमतीत होणारी भरमसाठ वाढ, याप्रकरणी भ्रष्ट अधिकारी यांच्याविरुध्द तातडीने कडक कारवाई करण्याची सतत होणारी मागणी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(११) श्री.रणधीर सावरकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजनेंतर्गत सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, अकोला येथे मंजूर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे बांधकाम पूर्ण होऊन वैद्यकीय सोयी सुविधा करिता सुसज्ज असणे, वैद्यकीय संचालनालयाने दिनांक २२ जानेवारी, २०१८ नुसार १०१६ पदांपैकी ५८७ पदांचा प्रस्ताव मा. सचिव वैद्यकीय शिक्षण यांना सादर केला असणे, सादर केलेल्या प्रस्तावानुसार फक्त ४६५ पदे मंजूर करून सदर पदे ३ टप्प्यात पदभरती करण्याचे शासन आदेश असणे, प्रथम टप्प्यातील २२३ पदे भारतीसाठी मंजुरी देण्यात आली असली तरी पदभरती न करणे, केवळ पदभरती अभावी सदर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल गोर गरिब व गरजू रुग्णांच्या रुग्ण सेवेत रुजू न होणे, अकोला, बुलढाणा, वाशीम, हिंगोली अशा जिल्ह्यातून रुग्ण उपचारासाठी अकोला येथे येणे, सदर सुपर स्पेशालिटी रुग्णालय सूरु न झाल्याने रुग्णांना खाजगी रुग्णालयात महागडा व खर्चिक उपचार घ्यावा लागत असणे, परिणामी रुग्ण व नागरिकांमध्ये हॉस्पिटल सुरु न झाल्याने पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**(१२) श्री. बालाजी किणीकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अंबरनाथ (जि.ठाणे) शहराला म.जी. प्राधिकरणामार्फत पाणी पुरवठा करण्यात येत असणे, अंबरनाथ शहराला १४० एम.एल.डी. पाणी कोठा मंजूर असतानाही १२० एम.एल.डी. पाणीपुरवठा होत असणे, म. जी. मार्फत नियमबाह्य पद्धतीने नगरपरिषद क्षेत्रातील मोठ्या गृहप्रकल्पांनी भांडवली अंशदान व अस्तित्वात असलेल्या नळ जोडणीचे बिले भरली नसतानाही स्वखर्चाने जलवाहिन्या टाकण्याची परवानगी देणे, अंबरनाथ शहराला पाणी प्रश्न भेडसावत असतानाही म.जी.प्रा. नियमबाह्य कृती करणे, पाणी पुरवठ्याच्या अनुषंगाने मा.मंत्री पाणीपुरवठा यांच्यासोबत झालेल्या चर्चेनुसार मा.मंत्री महोदयांनी जलवाहिन्यांची दुरुस्ती तातडीने करून पाणी पुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना दिल्या असतानाही टँकर माफियांशी असलेले लागेबांधे सुरक्षित ठेवण्याच्या हेतूने शहर व परिसरात कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करून उच्चभ्रूगृहनिर्माण संस्थांना योग्य पाणी पुरवठा करीत झोपडपट्टी व चाळींना कमी दाबाने पाणी पुरवठा करून शहरात लोकप्रतिनिधींबाबत ह्या विषयी रोषाची भावना निर्माण करणे, नागरिकांमध्ये म.जी. प्राधिकरणाबाबत तीव्र स्वरूपाचा असंतोष खदखदणे, अंबरनाथ जलव्यवस्थापन विभागातील कार्यकारी अभियंता पद गेल्या अनेक महिन्यांपासून रिक्त असल्याने उप अभियंत्याकडे प्रभारी पद असल्याने, याठिकाणी म.जी. प्राधिकरणाचा भोंगळ कारभार सुरु असणे, त्यामुळे नागरिकांमधून कार्यक्षम अधिकाऱ्याची पूर्णवेळ नेमणूक होण्याची मागणी होणे, याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता विचारात घेता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१३) श्री. किसन कथोरे, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. कुमार आयलानी, संजय केळकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"ठाणे जिल्ह्यातील मुरबाड व अंबरनाथ तालुक्याच्या सरहद्दीवर असलेल्या बारवी धरणाची उंची वाढवल्याने विस्थापित झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देताना मोजे तोंडली, तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे येथील श्री रामभाऊ बाळकृष्ण बांगर यांनी स्वमालकीच्या जागेचा मोबदला घेतला परंतु श्रीमती जिजाबाई काथोड विशे यांच्या घराचा जमिनीचा मोबदला खोटे व बनावट दस्तऐवज तयार करून श्री रामभाऊ बाळकृष्ण बांगर त्यांचे कुटुंबीय व श्री अनिल सकट यांनी हडप केलेला असणे, त्यामुळे श्रीमती जिजाबाई काथोड विशे यांनी उपोषण करण्याचा किंवा आत्मदहन करण्याचा इशारा देण्यात येणे, परंतु महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी व उपविभागीय अधिकारी, कल्याण यांनी श्री रामभाऊ बांगर व कुटुंबीय तसेच श्री अनिल सकल यांच्यावर कारवाई करून मोबदला देण्याबाबत पुढील योग्य ती कारवाई करू असे आश्वासन दिल्याने उपोषण व आत्मदहन करण्याचा निर्णय

अग्रिम प्रत

थांबवण्यात येणे, परंतु महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून व उपविभागीय अधिकारी, कल्याण यांच्याकडून श्री रामभाऊ बांगर यांचे कुटुंब व अनिल सकट यांच्यावर आजतागायत कोणतीही कारवाई झालेली नसणे, त्याचप्रमाणे श्री रामभाऊ बांगर व त्यांचे कुटुंबियांचे नावे बोगस घरे निवासी सदनीका दाखवून वाढीव मूल्यांकन करून शासनाचा निधी हडप करण्यात येणे जनावरांचे गोठे सुद्धा निवासी दाखवून मोबदला घेण्यात येणे व जमिनीचे मूल्यांकन करून मोबदला हडप करण्यात येणे तसेच ज्या जागेचा मोबदला घेतला आहे अशा जमिनीवर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ताबा घेण्यात न येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१४) श्री.समीर मेघे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात राष्ट्रीय बाल स्वास्थय (RBSK) कार्यक्रमांतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी केली जात असणे, त्यात जन्मतः कर्णबधिर आढळलेल्या १२ वर्षापर्यंतच्या बालकांवर Cochlear Implant (कॉक्लिअर इम्प्लांट सर्जरी) करण्याची शिफारस आलीयावर जंग संस्थेने केलेल्या शिफारशीस अनुसरुन जिल्हास्तरीय समितीचे मार्गदर्शनात करण्याची सुविधा यापूर्वी असणे, त्यावरील खर्च भागविण्यासाठी रु.५.२० लक्ष निधीची तरतूद असणे, त्याकरिता मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून अर्ज प्राप्त होणे अपेक्षीत असणे, केंद्र शासनाचे Social Justice & Empowerment मंत्रालयाचे मार्गदर्शक सुचनानुसार ADIP Scheme अंतर्गत २ वर्षे ते १४ वर्षापर्यंतच्या बालकांना शस्त्रक्रियेची सुविधा व त्यावरील खर्च भागविण्यासाठी रु.७.०० लक्ष निधीची तरतुद असणे, परंतु राज्य शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभागाकडून जन्मतः कर्णबधिर बालकांवर Cochlear Implant शस्त्रक्रियेसाठी नव्याने पात्रता व आवश्यकतेबाबतचे निर्देश दिले असणे, त्यानुसार या शस्त्रक्रियेसाठी ० ते २ वर्षे वयापर्यंतची बालके पात्र ठरविली असणे, या संदर्भात "The Association of Otolaryngologists of india" या ७५० डॉक्टरर्सच्या संघटनेमार्फत राज्य शासनाकडे निवेदन दिले असणे, त्यांचे शिफारशीनुसार जन्मतः कर्णबधीर असलेल्या बालकांचे RBSK तपासणीत ० ते २ वर्ष वयापर्यंत कर्णबधीर असल्याचे निदान होणे बरेचदा अशक्य असणे, त्यामुळे २ वर्षे वयानंतर कर्णबधिरतेचे निदान आढळल्यास शासनाच्या या योजनेतून बाधीत बालक लाभापासून वंचीत राहणे, ही बाब लक्षात घेता जन्मतः कर्णबधिर बालकांना Cochlear Implant या शस्त्रक्रियेचा लाभ घेण्यासाठी पुर्ववत २ ते १२ वयोगटातील बालके किंवा किमान ५ वर्ष वयापर्यंतच्या बालकांना पात्र ठरविण्यासाठी आवश्यकता असल्याची मागणी असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

अग्रिम प्रत

**(१५) श्री.संतोष दानवे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील (जि.जालना, ता.भोकरदन) नळणी खुर्द, जवखेडा, सिरसगांव (वा), बाबुलगांव, पिंपळगाव, कोठा दाभाडी इत्यादी गावांतील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची पदे अनेक वर्षांपासून रिक्त असल्याने पूर्व प्राथमिक शाळांत शिकणाऱ्या मुलांचे शैक्षणिक भविष्य अंधःकारमय होण्याची नामुष्की ओढवणे, सर्वसाधारण जिल्हा बदली प्रक्रिया २०२२ अंतर्गत शिक्षकांच्या बदली प्रक्रियेनंतर भोकरदन तालुक्यातील शिक्षकांची बरीचशी पदे रिक्त असल्याबाबत स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी लेखी स्वरूपात संबंधित अधिकाऱ्यांकडे मागणी केली असणे, जि.प.शाळा सांवगी (आ) केंद्रीय पिंपळगाव येथे १ ली ते ८ वी पर्यंत वर्ग असून एकूण २२० विद्यार्थी नियमित शिक्षण घेत असणे, शिक्षक संख्या मु अ सह एकूण ०६ शिक्षक कार्यरत असणे, ईयत्ता ६ वी ते ८ वी साठी फक्त एकच शिक्षक कार्यरत असणे, सदरहू शाळेत शिक्षक पदे रिक्त असून अद्याप नियुक्ती न झाल्याने शिक्षणाचा खेळखंडोबा होणे, पालक-गांवकऱ्यांची मागणी लक्षात घेऊन रिक्त पद असलेल्या शाळांतील रिक्त पदे प्राधान्याने भरण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष यामुळे सदरहू भागातील स्थानिक नागरिकांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष याबाबत शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

**(१६) श्री. कैलास गोरंट्याल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई ईमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळ (म्हाडा) यांच्या मालकीची १०००० चौ. मी. जागा प्रियदर्शनी सहकारी गृह निर्माण संस्था, लोकमान्यनगर, दादर यांना अभिहस्तांतरण करून विकास करण्याकरीता मान्यता देण्यात आलेली असणे, सदर जमीन ही इंदू मिलची असल्याने या प्रकल्पाचा ३३(५) अंतर्गत मुंबई मंडळाने विकास केला असता तर तेथील मिलकामगार रहिवश्यांचा पुनर्विकास करून ५०० किंवा अधिक सदनिका म्हाडाला उपलब्ध झाल्या असत्या, त्यात रेडी रेकनरच्या नियमानुसार अंदाजे १२०० ते १५०० कोटीचा म्हाडा ला फायदा झाला असता, परंतु सदर प्रस्ताव ३३ (७) अंतर्गत शासनाच्या परवानगी शिवाय फक्त दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून NOC घेऊन त्याआधारे विकासकाने पूर्णपणे अनियमिततेने मिळवून सर्व नियमांची पायमल्ली करून ५००० चौ.मी. जागेवर ८ मजली व अंदाजे १५०० कोटींच्या व्यावसायिक मॉलची अवैधरीत्या उभारणी केलेली असणे, सदर इमारतीचे बांधकाम अद्याप पूर्ण झालेले नसताना त्यास पूर्णत्वाचे प्रमाणपत्र OC देखील मिळालेले असणे, म्हाडाच्या NOC मध्ये ३०४७ चौ. मी. जागेवर ३ चटई क्षेत्र निर्देशांकाच्या नियमानुसार विकासकाने ९८०० चौ. फूट बांधकाम पुनर्रचना विभागाला

देणे बंधनकारक असणे, परंतु उपलब्ध कागदपत्रानुसार फक्त ४०१५२ चौ.फूट क्षेत्राच्या सदनिका दिल्याचे दिसून येणे, सदर NOC तत्कालीन मुख्याधिकारी यांनी दिलेली असणे, त्यानंतरच्या तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांच्या कालावधी मध्ये नियमानुसार विकासकाकडून वसूली केलेली नसणे, सध्याचे मुख्याधिकारी यांनी वसूली करणे अनिवार्य होते व त्यानंतरच उर्वरित ५००० चौ. मी. वर विकासकाला पुनर्विकास करण्यास परवानगी देणे अनिवार्य होते, म्हाडाच्या नियमांचे उल्लंघन केल्यास विकासकावर दंडात्मक कारवाई होऊन पुढील करार रद्द करण्याची तरतूद असणे, परंतु मुख्याधिकारी व प्रकल्प अभियंता आणि अन्य अधिकाऱ्यांशी केलेल्या आर्थिक व्यवहारामुळे विकासकावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसणे, परिणामी या विकासकाने NOC चे उल्लंघन केल्यामुळे त्यांच्यावर तातडीने फौजदारी कारवाई करून सदर प्रकल्प म्हाडाने ताब्यात घेऊन पूर्णत्वास नेण्याची आवश्यकता व विकासकाला म्हाडाच्या काळ्या यादीत टाकण्याबाबत तसेच विकासकाला मदत होईल अश्या प्रकारे वर्तन केल्यामुळे दोषी म्हाडा अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सात : शासकीय विधेयके :**

**(अ) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.शिरिष चौधरी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमिन पटेल, विकास ठाकरे, नाना पटोले व संजय जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अप्रकाशित प्रत

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान (एलआयटी) विद्यापीठ, नागपूर विधेयक, २०२३**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान (एलआयटी) विद्यापीठ, नागपूर विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, संजय जगताप, बळवंत वानखडे, विकास ठाकरे व शिरीष चौधरी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान (एलआयटी) विद्यापीठ, नागपूर विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अग्रिम प्रत

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ – लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान (एलआयटी) विद्यापीठ, नागपूर विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** **(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री नाना पटोले, बाळासाहेब थोरात, संजय जगताप, सुरेश वरपुडकर, अमिन पटेल, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, संग्राम थोपटे, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री बळवंत वानखडे, सुभाष धोटे, शिरीष चौधरी, कुणाल पाटील, मोहनराव हंबर्डे, रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२३ नापसंत करते."

**(ख) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.शिरीष चौधरी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अमिन पटेल, विकास ठाकरे, नाना पटोले व संजय जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अप्रकाशित प्रत

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.रविंद्र वायकर व भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ब) विधानपरिषदेने संमत केल्यास विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

सन २०२३ चे विधापरिषद विधेयक क्रमांक १० – महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३

**(बुधवार, दिनांक २ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**आठ : म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

**सर्वश्री बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, अजय चौधरी, अशोकराव चव्हाण, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री सुनिल प्रभू, नाना पटोले, राजेश टोपे, पृथ्वीराज चव्हाण, रविंद्र वायकर, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री प्राजक्त तनपुरे, राजन साळवी, विजय वडेट्टीवार, अनिल देशमुख, सुनिल राऊत, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, सुनिल केदार, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, वैभव नाईक, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. संजय पोतनीस, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री रमेश कोरगावकर, अमिन पटेल, कैलास घाडगे-पाटील, अमित देशमुख, नितीन देशमुख, सुरेश वरपुडकर, उदयसिंग राजपूत, रणजीत कांबळे, श्रीमती ऋतुजा लटके, श्री.संग्राम थोपटे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री कैलास गौरंट्याल, अमित झनक, कुणाल पाटील, शिरीष चौधरी, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री सुभाष धोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, पी.एन. सडोलीकर-पाटील, डॉ.विश्वजीत कदम, सर्वश्री शिरीषकुमार नाईक, राजेश एकडे, बळवंत वानखडे, राजू पारवे, विकास ठाकरे, सहसराम कोरोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, हिरामण खोसकर, झिशान सिध्दीकी,**

**संजय जगताप, लहु कानडे, धीरज देशमुख, ऋतुराज पाटील, राजू आवळे, विक्रमसिंह सावंत, जितेश अंतापूरकर, श्रीमती जयश्री जाधव, श्री.रविंद्र धंगेकर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात सातत्याने होणारा खातेबदल, कामाच्या विभागांकडे मंत्र्यांचे होत असलेले दुर्लक्ष, एकाच मंत्र्याकडे एकाहून अधिक जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी असणे, त्या माध्यमातून राज्याच्या विकासाला खीळ बसणे, राज्यात शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण लक्षणीय असणे, शासनाने विधानसभेत स्पष्ट आश्वासन देऊनही राज्यातील हजारो शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर रकमेचा लाभ न मिळणे, बोगस बी-बियाणे व खते विक्रीचे रॅकेट कार्यरत असूनही त्यावर गांभीर्याने कारवाई न होणे. राज्यातील नदी-नाल्यांचे खोलीकरण, रुंदीकरण व साखळी बंधाऱ्यांची कामे घेण्याची आवश्यकता, क्षतिग्रस्त तलावांसह सध्या कार्यान्वित असलेले सिंचन प्रकल्प निधीअभावी रखडणे, "शासन आपल्या दारी" उपक्रमाच्या माध्यमातून ऑनलाईन सुविधा ऑफलाईन देऊन त्याला राजकीय स्वरुप देणे, जनतेस त्याचा काहीही फायदा न होणे व कार्यक्रमाची जाहिरात व अंमलबजावणीसाठी अब्जावधी रुपयांचा वारेमाप खर्च होणे, तत्कालीन विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी महाराज नगर (औरंगाबाद) यांनी शेतकऱ्यांना सहाय्यभूत अनेक शिफारशी करणे, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शासनाच्या भूमिकेबाबत नाराजीची भावना निर्माण होऊन त्यांनी मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेणे, मागील सरकारने मंजूर केलेल्या समृद्धी महामार्गाचाच भाग असलेल्या जालना नांदेड महामार्गचे काम कुर्मगतीने सुरु असणे, जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना भूसंपादनाचा योग्य मोबदला न मिळणे, नांदेड-लातूर रेल्वे मार्गाचा प्रस्ताव अद्यापही तयार न होणे, मराठवाड्यामध्ये बूलेट ट्रेन प्रकल्प आणण्याकरिता शासन उदासीन असणे, हिंगोली सारख्या "ना उद्योग" भागातील सहकारी साखर कारखान्यांना पॅकेज स्कीम इन्सेंटिव अंतर्गत मिळणाऱ्या सवलती काढून घेणे, विमानतळांचा विकास व अद्यावतीकरणाबाबत शासन उदासीन असणे, राज्यभर विमानतळे उपलब्ध असूनही निवडक शहरे वगळता इतरत्र विमानसेवा सुरू नसणे, मनमाड औरंगाबाद परभणी रेल्वेच्या दुपदरीकरणास सुरुवातही न होणे, नाशिक-पुणे रेल्वेमार्गाचे काम खोळंबणे मराठवाडा व विदर्भात नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्याबाबत शासनाच्या उदासीनतेमुळे बेरोजगारी व आत्महत्यांचे प्रमाण वाढणे, राज्यातील औद्योगिक प्रकल्प बाहेर जाणे, पाण्याच्या उपलब्धतेचा विचार न करता घाईगडबडीने वॉटर ग्रीडची संकल्पना राबविणे, बाभळी धरणातून वाहून जाणारे पाणी अडवण्यासाठी तेलंगणा राज्याच्या सहमतीने सर्वोच्च न्यायालयाकडे संदर्भ न करणे, पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याची आवश्यकता असणे, शासकीय रुग्णालये व महाविद्यालयांची झालेली दुरवस्था वैद्यकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांची पदे न भरल्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय, एसईबीसी मधून ईडब्ल्यूएसचा विकल्प दिलेल्या मराठा उमेदवारांच्या नियुक्तीचे प्रकरण उर्जा विभागाकडे मागील दोन महिन्यांपासून प्रलंबित असणे, वैधानिक विकास मंडळांच्या पुनरुज्जीवनाबाबत केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे मागास भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला अनुशेष, जातीचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यात होत असलेली अक्षम्य

दिरंगाई, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, मराठा व इतर आरक्षणाच्या संदर्भात प्रचंड मोर्चे, उपोषणे, आत्महत्या करुनही या बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाच्या विविध योजनांना लाभ व्हावा म्हणून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सोय असणे, असे अर्ज करीत असताना संपूर्ण दिवसभर सर्व्हर डाऊन राहत असल्याने केवळ एका अर्जासाठी संपूर्ण दिवस वाया जाणे, शासनाच्या विविध विभागातील पद भरती करीता आयोजित करण्यात येत असलेल्या परिक्षांचे शुल्क अत्यंत जास्त असल्याने गरीब कुटुंबातील परिक्षार्थीना शुल्क भरण्यात अडचणी येणे, केवायसीच्या नावाखाली अतिवृष्टी व पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अनुदान न मिळणे, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा सेविकांच्या पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित असून काही महिन्यांपासून त्यांना पगारही न मिळणे, राज्याची ढासळलेली अर्थव्यवस्था, रोजगार देण्याची संधी असतानाही राज्यातील विविध विभागाअंतर्गत रिक्त असलेल्या २ लाख ४० हजार जागा न भरणे, ठराविक सदस्यांनाच विकास कामासाठी निधी उपलब्ध होत असल्याने समतोल विकासाच्या संकल्पनेला बसलेली खीळ, महाविकास आघाडी सरकारच्या काळातील कामांना दिलेली स्थगिती अद्यापही न उठविल्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**नऊ** : **सर्वश्री बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, अजय चौधरी, विजय वडेट्टीवार, अशोकराव चव्हाण, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री नाना पटोले, सुनिल केदार, सुनिल प्रभू, राजेश टोपे, पृथ्वीराज चव्हाण, रोहित पवार, प्रा. वर्षा गायकवाड, डॉ.विश्वजीत कदम, श्री रविंद्र वायकर, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री प्राजक्त तनपुरे, राजन साळवी, अनिल देशमुख, सुनिल राऊत, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, बाळासाहेब पाटील, सुनिल केदार, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, वैभव नाईक, संजय पोतनीस, ॲड. अशोक पवार, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री रमेश कोरगावकर, अमिन पटेल, कैलास घाडगे-पाटील, अमित देशमुख, नितीन देशमुख, सुरेश वरपुडकर, उदयसिंग राजपूत, शंकरराव गडाख, रणजीत कांबळे, श्रीमती ऋतुजा लटके, श्री संग्राम थोपटे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री कैलास गौरंट्याल, अमित झनक, कुणाल पाटील, शिरीष चौधरी, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री सुभाष धोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, पी.एन. सडोलीकर-पाटील, शिरीषकुमार नाईक, राजेश एकडे, बळवंत वानखडे, राजू पारवे, विकास ठाकरे, सहसराम कोरोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, हिरामण खोसकर, झिशान सिध्दीकी, संजय जगताप, लहु कानडे, धीरज देशमुख, ऋतुराज पाटील, राजू आवळे, विक्रमसिंह सावंत, जितेश अंतापूरकर, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री रविंद्र धंगेकर, सुनिल भुसारा, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यात जीवनावश्यक वस्तूंमध्ये झालेली भरमसाठ दरवाढ, ३७ टक्के दरवाढीमुळे वीज ग्राहक मेटाकुटीस येणे, बगॅसवर महावितरण कंपनीने साखर कारखान्यांकडून वीज खरेदीच्या

अप्रमाणित प्रत

दरात केलेली कपात, परिणामी साखर उद्योग अडचणीत येणे, महाऊर्जा संकेतस्थळात सातत्याने निर्माण होणाऱ्या तांत्रिक बिघाडामुळे शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असणे, १५ ते २० वर्षापूर्वीची थकबाकी टाकून वीज ग्राहकांकडून वीज बिले वसुलीसाठी महावितरण कंपनीकडून तगादा लावला जाणे, सहकारी पाणी संस्थांच्या वीजबिलात एप्रिल, २०२३ पासून पाच पटींनी केलेली भरमसाठ वाढ, ट्रान्सफॉर्मरअभावी शेतीच्या वीज जोडण्यासाठीचे प्रलंबित असलेले अर्ज, उद्योगांसाठीच्या वीज दरात मोठी वाढ झाल्याने उद्योग राज्याबाहेर जाण्याची भीती निर्माण होणे, शेतीपंप वीज जोडणीत झालेल्या भ्रष्टाचाराबाबत महावितरण कंपनीकडून अहवाल सादर करण्यात होत असलेली दिरंगाई, सौरउर्जा पॅनेलसाठी शासनाने आखून दिलेल्या दराऐवजी पुरवठादारांकडून दुप्पट दर वसूल होत असणे, एकात्मिक पाठयपुस्तकांचा दर्जा चांगला नसल्याने विद्यार्थी व पालकांना झालेला मनस्ताप, याबाबत चौकशी करण्याची आवश्यकता, अनधिकृत व बेकायदेशीर शाळांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य टांगणीला लागणे, शिक्षकांच्या रिक्त जागा तातडीने भरण्याची आवश्यकता, आरटीईअंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या फीचा परतावा थकीत असल्यामुळे अनेक शाळा आर्थिक अडचणीत येणे, बनावट शैक्षणिक प्रमाणपत्र बनविणाऱ्या टोळ्या कार्यरत असल्याची बाब उघडकीस येणे, आयआयटी व आयआयएम सारख्या संस्थांमध्ये विद्यार्थी गळती व आत्महत्यांचे वाढलेले प्रमाण, विविध शासकीय विद्यापीठात सुरु असलेला सावळागोंधळ, विद्यापीठांमध्ये मोठ्या प्रमाणात शिक्षक व शिक्षकेतर पदे रिक्त असणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत योग्य नियोजनाअभावी होत असलेला विलंब, डिप्लोमा इन व्हेटर्नरी सायन्स अभ्यासक्रमाची या शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी न होणे, राज्यातील शैक्षणिक संस्थांची देशपातळीवर क्रमवारीत झालेली घसरण, चर्नी रोड येथील सावित्रीबाई फुले शासकीय महिला वसतिगृहातील दुर्घटनेनंतर वरिष्ठांना पाठीशी घातले जाणे, राज्यातील ग्रामीण भागात आरोग्यव्यवस्थेचा उडालेला बोजवारा, राज्यातील चार जिल्ह्यात रेडिएशन सेंटर व कॅथ लॅब सुरु करण्याची घोषणा होऊनही अंमलबजावणीत होत असलेली दिरंगाई, अनधिकृत गर्भपात केंद्रांवर आळा घालण्यात सरकारला आलेले अपयश, शासकीय रुग्णालयांमधील औषधांच्या तुटवड्यामुळे रुग्णांचे होत असलेले हाल, अर्थसंकल्पात सार्वजनिक आरोग्य विभागाला पुरेसा निधी न मिळाल्यामुळे अनेक योजना रखडणे, जे.जे.रुग्णालय समुहातील सेंट जॉर्ज रुग्णालयात कर्मचाऱ्यांसह निवासी डॉक्टरांचा तुटवडा असल्याने काही विभाग बंद करण्याची ओढवलेली नामुष्की, कोविड महामारीत मृत्यूमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना अद्यापही आर्थिक मदत न मिळणे, राज्यात बोगस डॉक्टरांचे फुटलेले पेव, राज्याची एचआयएमएस प्रणाली बंद असल्याने रुग्णांना होत असलेला मनस्ताप, रॅगिंगविरोधी कायदा असूनही गेल्या वर्षभरात वैद्यकीय महाविद्यालयात रॅगिंगच्या चार घटना घडल्याचे उघडकीस येणे, ऑनलाईन गेमींगमुळे समाजातील तरुण व महाविद्यालयीन मुलांच्या भविष्यावर होत असलेले दुष्परिणाम, ऑनलाईन गेमींगमुळे लाखो तरुण उध्दवस्त होत असून त्यावर बंदी घालण्याची आवश्यकता, महापालिका रुग्णालयात जाणुनबुजून औषध तुटवडा निर्माण करण्याच्या झालेल्या प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याची आवश्यकता, ग्रामीण भागात शिक्षकांच्या १८ हजार जागा रिक्त असणे, बोगस शाळा व बोगस शिक्षकांवर कारवाई

अग्रिम प्रत

करण्याबाबत विभागाकडून होत असलेली टाळाटाळ, महसूल विभागातील जुने अभिलेख जीर्ण होणे, गायरान जमिनीवर गरीब, आदिवासींनी नाईलाजास्तव केलेली अतिक्रमणे नियमित करण्याबाबत सरकारकडून होत असलेली चालढकल, नवीन वाळू धोरणाचा उडालेला बोजवारा, अनुसूचित जाती व जमाती आयोगासाठी केंद्राच्या धर्तीवर स्वतंत्र कायदा करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, बार्टीसारख्या संस्था निर्माण करण्यामागील उद्देश सफल न होणे, बार्टीच्या भोंगळ कारभारामुळे पात्र विद्यार्थ्यांना फेलोशिप मंजूर न होणे, अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जेईई व नीट प्रवेश परीक्षा प्रशिक्षण योजना बार्टीकडून राबविली न जाणे, इतरमागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राज्यात ७२ वसतीगृहे मंजूर होऊन अदयाप सुरु न करणे, तसेच बिहारच्या धर्तीवर इतर मागासवर्गीय समाजाची जनगणना करणे आवश्यक असणे, समता प्रतिष्ठानमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासाबाबत सरकारच्या निष्क्रियतेमुळे धोरण ठरविण्यात झालेला अक्षम्य विलंब, धोकादायक झालेल्या शासकीय वसतिगृहांच्या पुनर्विकासाबाबत तातडीने धोरण ठरविण्याची आवश्यकता, मागासवर्गीय औद्योगिक सहकारी उत्पादन संस्थांचे प्रस्ताव दीर्घकाळ प्रलंबित असणे, स्वाधार योजनेतील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता अदा केला जात नसल्यामुळे विद्यार्थ्यांची होणारी परवड, अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाचा निधी अखर्चित राहणे, धर्मादाय संस्थाच्या जमिनी शासनाने आदेश देऊनही ताब्यात देत नसणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २ ऑगस्ट, २०२३

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

अस्थायी प्रत